

बस्तोडा हल्ल्याप्रकरणी ३६ तासांनंतरही कोणतीही अटक नाही
» पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



२७ दिवसांत ५ दिग्गज खेळाडूंनी घेतली निवृत्ती
» पान ४ वर

वेर्णा, बुधवार, ४ जून २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 272 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 4 June 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### देशातील सर्वात मोठा बँक दरोडा

**बंगळुरू, दि. ३ :** कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्यातील बँकेत देशातील सगळ्यात मोठा दरोडा पडला आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. कॅनरा बँकेच्या शाखेवर योजनाबद्ध दरोडा टाकत चोरट्यांनी ५९ किलो सोने घेऊन पोबारा केला. या सोन्याची किंमत जवळपास ५३ कोटी रुपये इतकी आहे. चोरट्यांनी ५.२ लाख रुपये लंपास केले. दरोडा टाकताना चोरट्यांनी काळ्या जादूचा वापर केला.

विजयपुराचे पोलीस अधीक्षक लक्ष्मण निंबर्गी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी एका सफाई कर्मचाऱ्याला चोरीबद्दल समजलं. या प्रकरणी २६ मे रोजी मंगोडीत कॅनरा बँकेच्या व्यवस्थापकाने तक्रार नोंदवली. २४ मे रोजी (चौथ्या शनिवारी) बँक बंद होती. २५ मे रोजी पार्ट टाईम सफाई कर्मचारी काम करत होता. त्यावेळी त्याला शटरचं कुलूप तुटलेलं दिसलं. यानंतर घटनेची माहिती पोलिसांना लगेचच देण्यात आली.

'बँकेच्या शाखेतून ५९ किलो सोने चोरीला गेले आहे. ग्राहकांनी सोने तारण ठेवून त्याबदल्यात कर्ज घेतले होते,' अशी माहिती पोलीस अधीक्षक लक्ष्मण निंबर्गी यांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, सहा ते आठ जणांच्या टोळीने सोन्याने भरलेली तिजोरी उघडण्यासाठी डुप्लिकेट चावीचा वापर केला.

---

### पंजाबमध्ये पाकिस्तानी गुप्तहेराला अटक

**अमृतसर, दि. ३ :** पंजाब पोलिसांच्या काउंटर इंटेलिजेंस युनिट आणि तरनतारन पोलिसांच्या संयुक्त कारवाईत, ऑपरेशन सिंदूरची माहिती पाकिस्तानी आयएसआय एजंटना पाठवणाऱ्या एका गुप्तहेराला अटक करण्यात आली आहे. आरोपीचे नाव गगनदीप सिंग उर्फ गगन असे आहे, जो मोहल्ला रोडुपूर गली नजर सिंग वली, तरनतारन येथील रहिवासी आहे.

पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयला संवेदनशील लष्करी माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली आरोपीला अटक करण्यात आली आहे. डीजीपी गौरव यादव यांच्या म्हणण्यानुसार, प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की गगनदीप सिंग गेल्या पाच वर्षांपासून पाकिस्तानस्थित खलिस्तानी समर्थक गोपाल सिंग चावला यांच्या संपर्कात होता. चावला यांच्यामार्फतच त्याची पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांशी ओळख झाली. आरोपींनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान लष्कराच्या कारवाया, सैन्य तैनाती आणि भारतातील मोक्याच्या ठिकाणांबद्दल पाकिस्तानसोबत माहिती शेअर केली होती, ज्यामुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला मोठा धोका निर्माण होऊ शकला असता.

---

### तमिळनाडूच्या विधेयकांना राज्यपालांची मंजुरी

**नवी दिल्ली, दि. ३ :** तामिळनाडूचे राज्यपाल आरएन रवी यांनी सरकारने मंजूर केलेल्या दोन विधेयकांना मंजुरी दिली आहे. यामुळे १२,००० हून अधिक अपंगांना शहरी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोंदणी करण्याचा अधिकार मिळेल. ही विधेयके राजभवनात बऱ्याच काळापासून प्रलंबित होती. राज्यपालांच्या या निर्णयावर मुख्यमंत्री एमके स्टॅलिन म्हणाले– ही मंजुरी होणे बंधनकारक होते. राज्यपालांना भीती होती की जर विधेयके पुन्हा थांबवली गेली तर आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाऊ. ८ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडूचे राज्यपाल आणि राज्य सरकारच्या बाबतीत राज्यपालांच्या अधिकाराच्या मर्यादा निश्चित केल्या होत्या. खंडपीठाने म्हटले होते की राज्यपालांना व्हेटो पॉवर नाही. तसेच राज्यपालांनी सरकारच्या १० महत्त्वाच्या विधेयकांना रोखण्याचा निर्णय बेकायदेशीर ठरवला. न्यायालयाने म्हटले होते की हे एक मनमानी पाऊल आहे आणि कायद्याच्या दृष्टिकोनातून योग्य नाही. राज्यपालांनी राज्य विधानसभेला मदत करायला हवी होती आणि सल्ला द्यायला हवा होता.

# म्हादई वाचवण्यासाठी बेळगावात शक्तिप्रदर्शन!

■ टीम दैनिक हेराल्ड :

**बेळगाव, दि. ३ : म्हादई आणि कळसा–भांडुरा जलप्रकल्पांमुळे पश्चिम घाटातील जैवविविधता आणि वनसंपदेला गंभीर धोका निर्माण झाला असून, पावसाअभावी संपूर्ण उत्तर कर्नाटक वाळवंटीकरणाच्या उंबरठ्यावर येईल, असा इशारा देत पर्यावरणप्रेमी संस्था आणि नागरिकांनी 'रॅली फॉर बेळगाव' या जनआंदोलनाच्या माध्यमातून आज (मंगळवार) सकाळी बेळगाव जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले.**

शहरातील सरदार हायस्कूल मैदानावरून सुरू झालेल्या या रॅलीत खानापूर तालुक्यासह बेळगाव परिसरातील शेकडो नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, पर्यावरणप्रेमी आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. म्हादाई नदीच्या रक्षणासाठी, हिडकल जलाशयाचे पाणी हुबळी–धारवाडकडे वळवण्याच्या प्रस्तावित प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शविण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विविध मान्यवरांच्या पर्यावरणसंबंधी विचारांनी झाली. राष्ट्रीय स्तरावरील पर्यावरण कार्यकर्ती आणि अवघ्या १७ वर्षांची सिद्धिमा पांडे हिने भावनिक आवाहन करत सांगितले, जंगल, नद्या आणि संपूर्ण परिसंस्था यांचे संरक्षण हे आपले कर्तव्य आहे. झाडांशिवाय आणि पाण्याविना मानवजातीचे अस्तित्वच शक्य नाही. मोर्चामध्ये फक्त चालून नव्हे, तर पर्यावरणासाठी व्यक्तिगत पातळीवर योगदान देण्याची मानसिकता घेऊन आपण पुढे जावे.

त्यानंतर अन्य मान्यवरांनीही निसर्गसंवर्धनाबाबत विचार मांडले. त्यांनी प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी जंगलांचे संरक्षण केले असल्याचा दाखला देत म्हादाई नदीचे पाणी वळवल्यास तेथील वनसंपदा नष्ट होईल, असा इशारा दिला आणि संबंधित जलप्रकल्प रद्द करण्याची मागणी केली.

म्हादाई वाचवा, आमचे भविष्य वाचवा' या घोषवाक्याखाली सरदार हायस्कूल मैदानावरून निघालेल्या मोर्चाने कॉलेज रोड, कित्तूर राणी चन्नम्मा सर्कल मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. हातात 'म्हादाई वाचेल तर मलप्रभा वाचेल', 'म्हादाई वळवू नका, तिला मुक्त वाहू द्या', 'आमचे पाणी, आमचा हक्क' असे विविध फलक आणि घोषणा देत निघालेला मोर्चा नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. महिलांचाही सहभाग विशेष उल्लेखनीय होता.

मोर्चाची सांगता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात झाली. यावेळी जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन यांना आंदोलकांनी निवेदन सादर केले. निवेदनाचा स्वीकार करताना जिल्हाधिकारी रोशन यांनी आंदोलकांच्या मागण्या शासनाच्या निदर्शनास आणून

पान २ ▶







### म्हादईचा लढा बेळगाव गोव्याने एकत्र येऊन लढावा : घाटे

**गोव्यातून म्हादईचे पाणी वळविण्यास विरोध करणाऱ्या गोव्यातील म्हादई बचाव आंदोलनाला बेळगावच्या आंदोलनामूळे बळ मिळाले आहे असे सामाजिक कार्यकर्ते राजन घाटे यांनी मंगळवारी आझाद मैदानात सांगीतले. बेळगावच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आवाहन करणाऱ्या घाटे यांनी गोव्यातील म्हादई बचाव आंदोलनातील कमी झालेल्या धगीबद्धल चिंता व्यक्त केली. म्हादई वाचविण्यासाठी व्याघ्र प्रकल्प क्षेत्र घोषित करणे अत्यंत गरजेचे आहे. आतापर्यंत या विषयासाठी सरकारने ७ ते ८ कोटी रूपये खर्च केले आहेत. मंत्री म्हणतात की, राज्यात वाघ नाही. परंतु, आज वाघ, बिबटे गावागावात पोहोचले आहेत. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन घाटे यांनी केले. म्हादई आमची जीवनदायिनी आहे. पण म्हादईसाठी राज्यात कुठेच चळवळ होत नाही, उलट कर्नाटकमधील बेळगाव येथे म्हादई वळविण्याविरोधात मोर्चा काढला जात आहे. हे खरोखरच कौतुकास्पद आहे. आम्हीही या मोर्चाला पाठिंबा दिला पाहिजे, तरच म्हादई वाचणार आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते राजन घाटे यांनी दिली.**

**प्रा. राजेंद्र केरकर यांनी अनेकदा आम्हाला मार्गदर्शन केले आहे, पण त्यांना लोकांकडून बळ मिळाले नाही. व्याघ्र प्रकल्प क्षेत्र व्हावे यासाठी आम्ही प्रयत्न करत होतो, तेव्हा आमच्याच पंचायतीमधील सरपंच, पंच सदस्यांनी दबावात येत याला विरोध केला. उच्च न्यायालयाने आम्हाला व्याघ्र प्रकल्प क्षेत्र करण्यासाठी मान्यता दिली आहे तर ते का होत नाही? आमच्याच स्वार्थासाठी आम्ही म्हादईचा गळा घोटला आहे, असे घाटे यांनी सांगितले.**

# 'तुमची नाडी आमच्या हातात'; टॅक्सी चालकांचा आमदारांना इशारा !

▶ कॅब ॲग्रिगेटर धोरणावरून टॅक्सी चालक संतप्त

▶ आमदार लोबोंची घेतली भेट

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**म्हापसा, दि. ३ :** गोव्यातील पारंपरिक टॅक्सी व्यवसाय धोक्यात आणणाऱ्या राज्य सरकारच्या प्रस्तावित 'कॅब ॲग्रिगेटर धोरणा'च्या विरोधात संतप्त टॅक्सीचालकांनी मंगळवारी आमदार मायकल लोबो व आमदार डिलायला लोबो यांच्या निवासस्थानी ठिय्या देत तीव्र निषेध व्यक्त केला. आमदारांनी ठोस पाठिंबा दिला नाही, तर त्यांच्या दारात भीक मागू, असा थेट इशारा व्यावसायिकांनी दिला.

पर्रा येथील या आक्रमक चर्चेत टॅक्सीचालकांनी राजपत्रातील धोरणाची प्रत फाडून सरकारविरोधी रोष प्रकट केला. अनेक वर्षे आमच्यावर केवळ आश्वासनांचा पाऊस पाडणाऱ्या लोकप्रतिनिधींना आता कारवाईत उतरावे लागेल, अन्यथा आगामी निवडणुकांत त्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा सज्जड इशाराही देण्यात आला.



कळंगुट आणि शिवोली मतदारसंघातील स्थानिक टॅक्सीचालकांनी एकत्र येत लोबो दांपत्याची भेट घेतली. कॅब ॲग्रिगेटर धोरण आमचे जीवन उद्ध्वस्त करणार आहे. सरकारच्या या धोरणाचा आम्ही तीव्र निषेध करतो. लोबोंनी जर खरंच आमच्या पाठीशी उभं राहायचे असेल, तर त्यांनी सरकारविरोधात आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी आग्रही मागणी टॅक्सी संघटनेचे नेते योगेश गोवेकर यांनी यावेळी केली.

टॅक्सीचालकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर कॅब ॲग्रिगेटर धोरण लागू झाले, तर स्थानिक पारंपरिक टॅक्सी व्यवसायच नष्ट होईल. तंत्रज्ञानाच्या नावाखाली आमचं पोट मारण्याचा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. सरकारने हे धोरण तातडीने मागे घ्यावे, अशी मागणी करण्यात आली.

चर्चा गरम झाली असताना काही क्षणांसाठी आमदार मायकल लोबोही संतापले. टॅक्सीचालकांनी केलेल्या रोषपूर्ण भाष्यांमुळे वातावरण तापले होते. मात्र, नंतर लोबोंनी संयम राखत तोडग्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. हा व्यवसाय गोवेकरांच्या हातातच राहावा, यासाठी आम्ही सरकारकडे पाठपुरावा करू, असे त्यांनी स्पष्ट केले.

कोणीही आमच्या उपजीविकेवर राजकारण करू नये. जर आमदारांनी आज आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले, तर उद्या आम्ही त्यांच्या दारात कुटुंबासह बसू. आमच्याच भागातील प्रतिनिधींनी आमच्याच विरोधात भूमिका घेतली, तर मतांच्या रुपात उत्तर देण्याची ताकद आम्ही ठेवतो, असे म्हणत टॅक्सीचालकांनी आपली नाराजी स्पष्टपणे व्यक्त केली.

पान २ ▶

# भीक मागण्यासाठी बालकांचा वापर करणाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३ :** मडगाव शहरातील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी पुन्हा एकदा भिक्षेकऱ्यांची वाढती संख्या आणि विशेषतः सहानुभूती मिळवण्यासाठी लहान मुलांचा वापर करण्याच्या घटनांनी सामाजिक संघटनांची चिंता वाढवली आहे. 'बायलांचो एकवोट' या महिलांच्या संघटनेने यासंदर्भात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत, प्रशासनाकडून कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची मागणी केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, सक्षम प्रौढ व्यक्ती लहान मुलांना सोबत घेऊन रस्त्यावर भीक मागत असून, ही गोष्ट केवळ बेकायदेशीर नाही तर सार्वजनिक सहानुभूतीचा गैरफायदा घेण्याचा प्रकार आहे. गरिबीच्या नावाखाली होत असलेला हा प्रकार खरेतर गैरवापर आहे. या मुलांचा वापर करून नागरिकांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे संघटनेच्या अध्यक्षा आवदा व्हिएगस यांनी नमूद केले.

यावर्षीच्या सुरुवातीला, संघटनेने दक्षिण गोव्याचे जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांच्याकडे पॉवर हाऊस जंक्शनसारख्या ठिकाणी वाढलेल्या भिक्षावृत्तीविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षक (दक्षिण) यांच्या सहकार्याने तात्काळ कारवाई केली आणि संबंधित ठिकाणे स्वच्छ करण्यात आली होती. याबद्दल संघटनेने त्या वेळी प्रशासनाचे कौतुकही केले होते.

परंतु अलीकडील घडामोडींनुसार, तीच परिस्थिती पुन्हा उद्भवत असल्याचे 'बायलांचो एकवोट च्या निरीक्षणात आले आहे. पॉवर हाऊस जंक्शन परिसरात पुन्हा ही मंडळी दिसत आहेत. ही समस्या साध्या गरिबीपुरती मर्यादित नाही. त्यांच्याबद्दल काहीही माहिती नाही . हे लोक बांगलादेशी आहेत, पाकिस्तानी आहेत, की स्थानिक चोरांच्या हालचालींसाठी काम करणारे हस्तक काही सांगता येत नाही, असे व्हिएगस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

संघटनेने असेही म्हटले आहे की, भिक्षावृत्तीसाठी लहान मुलांचा वापर करणे हे मुलांवरील शोषण आहे. त्यामुळे प्रशासन आणि कायदा अंमलबजावणी यंत्रणांनी सातत्याने कठोर पावले उचलावीत. भीक मागणे हा कायद्याने गुन्हा आहे. नागरिकांनी देखील रस्त्यावर भीक मागणाऱ्यांना पैसे देणे थांबवावे, कारण त्यामुळेच हा गैरप्रकार वाढीस लागतो, असे व्हिएगस यांनी आवाहन केले. मडगाव रेल्वे स्थानक परिसरातील अतिक्रमण, पदपथांवर राहणे, स्वयंपाक करणे, रेलिंगवर कपडे वाळत घालणे आणि वाहनांची अव्यवस्थित पार्किंग अशा समस्यांकडेही संघटनेने लक्ष वेधले. यामुळे शहराचे सौंदर्य आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, वाहतुकीच्या मार्गांवर लहान बाळांना हातात घेऊन फिरणाऱ्या

पान २ ▶

# ५३० अग्निवीरांचा 'पासिंग आउट परेड' सोहळा थाटात

## ३१ आठवड्यांच्या प्रशिक्षणानंतर हे जवान भारतीय लष्कराच्या सिग्नल कॉर्प्समध्ये समाविष्ट

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३ :** गोव्यातील दुसऱ्या सिग्नल प्रशिक्षण केंद्रात लष्करी आणि तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या ५३० अग्निवीरांच्या 'पासिंग आउट परेड'चा भव्य सोहळा रविवारी पार पडला. ३१ आठवड्यांच्या कठोर प्रशिक्षणानंतर हे जवान भारतीय लष्कराच्या सिग्नल कॉर्प्समध्ये अधिकृतपणे समाविष्ट झाले. या गौरवशाली सोहळ्याला केंद्राचे कमांडंट ब्रिगेडियर हर्ष भाटिया यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. त्यांनी संपूर्ण परेडचा आढावा घेत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अग्निवीरांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. नागरी जीवनातून लष्करी जीवनात यशस्वी संक्रमण साधणाऱ्या या तरुणांना त्यांनी विशेष शुभेच्छा दिल्या.



संरचित आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणामुळे हे अग्निवीर आज भारतीय सैन्याच्या सिग्नल कॉर्प्समध्ये सामील होण्यासाठी सज्ज झाले आहेत, असे ब्रिगेडियर भाटिया यांनी सांगितले. त्यांनी प्रशिक्षण स्टाफच्या कार्यक्षमतेचे विशेष कौतुक केले आणि अग्निवीरांच्या कुटुंबीयांचेही आभार मानले. आपल्या मुलांना राष्ट्रसेवेकरिता समर्पित करण्यामागे तुम्ही दिलेला मानसिक आधार महत्त्वाचा आहे, असेही ते म्हणाले. परेडमध्ये सैनिकांच्या शिस्तीचे, समन्वयाचे आणि एकात्मतेचे प्रतीक म्हणून उल्लेखनीय सादरीकरण करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी अनेक अग्निवीरांना गौरवण्यात आले.

अग्निवीर पियुष रमेश पाटील , अग्निवीर रजत इंदोलिया आणि अग्निवीर गोविंद कुमार यांनी त्यांच्या संबंधित अभ्यासक्रमांत एकूण प्रथम क्रमांक पटकावत 'मेरिट पदक' मिळवले. अग्निवीर देवरा शिवा यांना उत्कृष्ट क्रीडापटू म्हणून सन्मानित करण्यात आले, तर अग्निवीर विकास गौडा यांना उत्तम ड्रिलसाठी विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमानंतर ब्रिगेडियर भाटिया यांनी सर्व उपस्थित कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यांनी पालकांना 'गौरव पदक' प्रदान करून त्यांचा विशेष सत्कार केला. अग्निवीरांच्या मानसिक व भावनिक बळामागे त्यांच्या कुटुंबांचा मोठा वाटा आहे,असे नमूद करत त्यांनी कुटुंबीयांच्या समर्पणाला सलाम केला.

हा कार्यक्रम केवळ प्रशिक्षणाच्या समारोपाचा नव्हता, तर एक नवा अध्याय सुरू होण्याचा क्षण होता. सन्मान, समर्पण आणि सेवा हे सैनिकी जीवनाचे मूळ मूल्य असून, यापुढील प्रवासात हे सर्व अग्निवीर भारतीय लष्कराचे अभिमानास्पद प्रतिनिधी ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.